# बोदवड महाविद्यालयात रिसेंट ॲडव्हानसेस इन बेसिक सायन्सेस या विषयावर पोस्टर प्रेझेन्टेशन चे आयोजन

(08.02.2029) विज्ञानातील नवनवीन घटना विदयार्थ्यांना समजाव्या व त्या सर्व घटकापर्यंत पोहोचले पाहिजे या उद्देशाने बोदवड महाविद्यालयात रिसेंट ॲडव्हानसेस इन बेसिक सायन्सेस या विषयावर पोस्टर प्रेझेन्टेशन चे आयोजन विज्ञान मंडळाद्वारे दि. 08/ 02/2020 रोजी करण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन न. ह. राका विद्यालयाचे शिक्षक श्री. एच. एल. पाटील यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी, उप-प्राचार्य श्री. डी. एस. पाटील, विज्ञान मंडळाचे प्रमुख डॉ. अनिल बारी व विज्ञान विभातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सदर प्रदर्शनात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, गणित व कॉम्पुटर या विषयामध्ये नव्याने घडलेल्या विविध घटना पोस्टर्स स्वरूपात मांडल्या. त्यात प्रामुख्याने डाटा स्टोरेज इन डी. एन ए., फूड वेब अप्लिकेशन ऑफ फिजिक्स कोरोना व्हायरस, मथेमेटीक्स इन लाईफ, टी. बी. अशा अनेक विषयाचे पोस्टर्स विद्यार्थ्यांनी प्रदर्शनात लावले होते. सदर प्रदर्शनात महाविद्यालयातील जास्ती जास्त संखेने विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन उस्फूर्त पतिसाद दिला. सदर पोस्टर्स परीक्षक म्हणून श्री. एच. एल. पाटील व श्री. ए. एस. पाटील यांनी कामा पाहीले. सदर कार्यक्रमच्या यशस्वीते साठी विज्ञान मंडळ प्रमुख डॉ. अनिल बारी, डॉ. गीता पाटील, डॉ. रुपेश मोरे, डॉ. चेतन शर्मा, श्री. नितेश सावदेकर, श्री. संजय भाते, श्री. समीर पाटील, नामदेव बडगुजर, दीपक जोशी, अतुल हिवराळे, विजय धोबी यांनी सहकार्य केले.



